ARTHA, Poona 4

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें प्रमुख मराठी वृत्तपत्र

स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या बुधवारीं प्रसिद्ध होतें.

वार्षिक वर्गणी : ६ रु.

दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3131. Licence No. 53.

वर्ष २९ | पुणें, बुधवार तारीख ६ फेब्रुवारी, १९६३ | अंक ३

## विविध माहिती

**चीन अणुबॉंबचा स्फोट करणार**—चीनचे शास्त्रज्ञ स्वतः बनविलेल्या अणुबॉंबचा प्रायोगिक स्फोट करण्याची तयारी करीत आहेत, अशी वार्ता ल्हासा रेडिओवरून सांगण्यांत आली. चीनच्या अणुबॉंबसंबंधींची ही वार्ता ह्यापूर्वीहि दोन वेळा ल्हासा रेडिओवरून सांगण्यांत आली होती. भारत व आग्नेय आशिआंतील देशांना धमकी देण्याचा इरादा बातमीमागें असावा.

**दक्षिण भारतांत तेलशुद्धीचा कारखाना**—सार्वजनिक मालकीच्या क्षेत्रांत तेलशुद्धीचा चौथा कारखाना काढण्याचें भारत सरकारनें ठरविलें असून तो बहुधा मद्रास अगर कोचीनमध्यें उभारण्यांत येईल. हा कारखाना काढण्याच्या कामीं एका इटालिअन तेल-संघटनेनें आणि एका अमेरिकन कारखान्यानें सहकार्य करण्याची तयारी दाखविलेली आहे.

**यांत्रिक हत्यारांसाठीं मध्यवर्ती संस्था**—बंगलोर येथें यांत्रिक हत्यारांसाठीं एक मध्यवर्ती संस्था काढण्याच्या कामीं झेकोस्लोव्हाकिआ व भारत ह्यांच्या दरम्यान करार झाला आहे. ह्या संस्थेंत यांत्रिक हत्यारांबाबतचें संशोधन करणें, त्यांचे नमुने तयार करणें, इत्यादी कामें करण्यांत येतील. संस्थेच्या स्थापनेसाठीं लागणारें ६० लाख रुपयांचें परदेशीय चलन झेकोस्लोव्हाकिआ देणार आहे.

**मॉस्कोंत भारतीय मालाचें प्रदर्शन**—१९६३ च्या जून-जुलै महिन्यांत मॉस्कोमध्यें भारतीय मालाचें एक प्रदर्शन भरविण्याचें मध्यवर्ती सरकारनें ठरविलें आहे. भारतामधील कच्चा माल, अर्धसंस्कारित माल व पक्का माल ह्यांचा समावेश प्रदर्शनांत करण्यांत येईल. भारतानें गेल्या पंधरा वर्षांत केलेल्या प्रगतीची माहिती देणें हा प्रदर्शनाचा हेतु आहे.

**दिल्लींतील कचेऱ्या हलणार ?**—दिल्ली शहरांत सरकारी कचेऱ्यांना जागा मिळणें एरव्हींसुद्धां कठीण जातें. चीनबरोबरील युद्धपरिस्थितीमुळें जागेची टंचाई अधिकच वाढली आहे. त्यामुळें येत्या दोनतीन महिन्यांत भारत सरकार आपल्या कांहीं कचेऱ्या इतरत्र हलविणार आहे. निरनिराळ्या खात्यांच्या मिळून सुमारें २० कचेऱ्या भारतामधील कांहीं प्रमुख शहरांतून नेल्या जातील.

**लोकसंख्येची तुलनात्मक वाढ**—धारवाड येथील रोटरी क्लबांत डॉ. टुबे ह्या अमेरिकन शिरगणती-तज्ज्ञाचें भाषण झालें. ते आपल्या भाषणांत म्हणाले, कीं अमेरिकेंतील लोकसंख्येंत दरसाल ३० लाखांची भर पडत असते. भारतांत मात्र लोकसंख्येची वार्षिक वाढ ९० लाखाइतकी प्रचंड आहे. इतक्या वेगानें वाढणारी लोकसंख्या हीं चिंतेची बाब असून तिला सत्वर आळा घालणें अतिशय जरूरीचें आहे.

**मध्यप्रदेशांत कोळशाची नवी खाण**—राष्ट्रीय कोळसा-विकास मंडळानें मध्यप्रदेशांतील सरगुजा जिल्ह्यांत एक नवी कोळशाची खाण उघडण्याचें ठरविलें आहे. ह्या खाणींतून दरसाल ५ लाख टन कोळसा काढण्यांत येईल. ह्या भागांतील कोळशाचा भूमिगत सांठा सुमारें ३ कोटी टन आहे. खाण चालू करण्यासाठीं सुमारें २·६० कोटी रुपये खर्च येणार आहे.

**सरहद्दीवरील रस्त्यांची बांधणी**—नेफा व लडाख ह्या भारताच्या सरहद्दीवरील भागांत लष्करासाठीं रस्ते बांधण्यासाठीं दोन वर्षांपूर्वीं एक संघटना स्थापन करण्यांत आलेली आहे. संघटनेनें रस्ते बांधण्याचें काम जलदीनें पुरें करावें म्हणून निकड लावण्यांत आली आहे. रस्ते बांधण्याची यंत्रसामग्री व माणसें ह्यांचा मुबलक पुरवठा करण्यांत येणार आहे.

**मध्यवर्ती सरकारी नौकरांची मालमत्ता**—मध्यवर्ती सरकारच्या नौकरांना आतांपर्यंत दरवर्षी त्यांच्या मालकीच्या स्थावर मालमत्तेची माहितीच तेवढी सरकारला पुरवावी लागत असे. परंतु चालू वर्षापासून बँकेंतील शिल्लक, रोखे, शेअर्स, इत्यादींची माहितीहि पुरवावी लागणार आहे. पैशाच्या रूपांत लांच खाणारे सरकारी नौकर स्थावर मालमत्ता घेतच नाहींत. त्यामुळें त्यांच्याजवळील मालमत्ता कळत नाहीं अशा तक्रारी करण्यांत आलेल्या आहेत.

**तेलाच्या नळांचा पुरवठा**—नाटो लष्करी संघटनेला जपानतर्फे असें कळविण्यांत आलें आहे कीं, रशियाला जपान पुरवीत असलेलें तेलवहातुकीचें नळ ह्यापुढें पुरविण्यांत येणार नाहींत. मात्र पूर्वीं झालेल्या करारांतील पुरवठा बंद करण्यांत येणार नाहीं. ह्या कराराप्रमाणें जपानमधील यावाटा पोलाद कंपनी रशियाला ५,००० टन वजनाचे नळ पुरविणार आहे.

**रस्त्याच्या उजव्या बाजूनें चाला**—स्वीडनच्या पार्लमेंटमध्यें, रस्त्यामधील वाहतूक उजव्या बाजूनें करण्यांत यावी ह्यासंबंधीं एक बिल चालू वर्षीं मांडण्यांत येणार आहे. हें बिल मंजूर झाल्यास फक्त ब्रिटनमधील वाहनांची वाहतूकच काय ती डाव्या बाजूनें चालू राहील; युरोपमधील बाकीच्या सर्व देशांतील वहातूक उजव्या बाजूनें चालू होईल.

**राष्ट्रीय संरक्षणनिधीला मोठी मदत**—आसाममधील एका विधवेनें राष्ट्रीय संरक्षण निधीला मदत म्हणून आपली सर्व मालमत्ता देऊन टाकली आहे. ह्या बाईना मूलबाळ नाहीं. त्यांनीं आपली २ लाख रुपये किंमतीची सर्व मालमत्ता निधीला दिलीच; पण त्याशिवाय २०० तोळें सोनेंहि निधीला अर्पण केलें. बाईचें वय अवघें २८ वर्षें आहे.

ARTHA, Poona 4

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें प्रमुख मराठी वृत्तपत्र

स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वार्षिक वर्गणी : ६ रु.
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २९ | पुणें, बुधवार तारीख ६ फेब्रुवारी, १९६३ | अंक ३

## विविध माहिती

**चीन अणुबाँबचा स्फोट करणार**—चीनचे शास्त्रज्ञ स्वतः बनविलेल्या अणुबाँबचा प्रायोगिक स्फोट करण्याची तयारी करीत आहेत, अशी वार्ता ल्हासा रेडिओवरून सांगण्यांत आली. चीनच्या अणुबाँबसंबंधींची ही वार्ता ह्यापूर्वीहि दोन वेळा ल्हासा रेडिओवरून सांगण्यांत आली होती. भारत व आग्नेय आशिआं-तील देशांना धमकी देण्याचा इरादा बातमीमागें असावा.

**दक्षिण भारतांत तेलशुद्धीचा कारखाना**—सार्वजनिक मालकीच्या क्षेत्रांत तेलशुद्धीचा चौथा कारखाना काढण्याचें भारत सरकारनें ठरविलें असून तो बहुधा मद्रास अगर कोचीनमध्यें उभारण्यांत येईल. हा कारखाना काढण्याच्या कामीं एका इटालिअन तेल-संघटनेनें आणि एका अमेरिकन कारखान्यानें सहकार्य करण्याची तयारी दाखविलेली आहे.

**यांत्रिक हत्यारांसाठी मध्यवर्ती संस्था**—बंगलोर येथें यांत्रिक हत्यारांसाठी एक मध्यवर्ती संस्था काढण्याच्या कामीं झेकोस्लोव्हाकिआ व भारत ह्यांच्या दरम्यान करार झाला आहे. ह्या संस्थेंत यांत्रिक हत्यारांबाबतचें संशोधन करणें, त्यांचे नमुने तयार करणें, इत्यादी कामें करण्यांत येतील. संस्थेच्या स्थापनेसाठी लागणारे ६० लाख रुपयांचें परदेशीय चलन झेकोस्लोव्हाकिआ देणार आहे.

**मॉस्कोंत भारतीय मालाचें प्रदर्शन**—१९६३ च्या जून-जुलै महिन्यांत मॉस्कोमध्यें भारतीय मालाचें एक प्रदर्शन भर-विण्याचें मध्यवर्ती सरकारनें ठरविलें आहे. भारतामधील कच्चा माल, अर्धसंस्कारित माल व पक्का माल ह्यांचा समावेश प्रदर्शनांत करण्यांत येईल. भारतानें गेल्या पंधरा वर्षांत केलेल्या प्रगतीची माहिती देणें हा प्रदर्शनाचा हेतु आहे.

**दिल्लींतील कचेऱ्या हलणार ?**—दिल्ली शहरांत सरकारी कचेऱ्यांना जागा मिळणें एरव्हींसुद्धां कठीण जातें. चीनबरोबरील युद्धपरिस्थितीमुळें जागेची टंचाई अधिकच वाढली आहे. त्यामुळें येत्या दोनतीन महिन्यांत भारत सरकार आपल्या कांहीं कचेऱ्या इतरत्र हलविणार आहे. निरनिराळ्या खात्यांच्या मिळून सुमारें २० कचेऱ्या भारतामधील कांहीं प्रमुख शहरांतून नेल्या जातील.

**लोकसंख्येची तुलनात्मक वाढ**—धारवाड येथील रोटरी क्लबांत डॉ. टुवे ह्या अमेरिकन शिरगणती-तज्ज्ञाचें भाषण झालें. ते आपल्या भाषणांत म्हणाले, कीं अमेरिकेंतील लोकसंख्येंत दरसाल ३० लाखांची भर पडत असते. भारतांत मात्र लोकसंख्येची वार्षिक वाढ ९० लाखाइतकी प्रचंड आहे. इतक्या वेगानें वाढणारी लोकसंख्या ही चिंतेची बाब असून तिला सत्वर आळा घालणें अतिशय जरूरीचें आहे.

**मध्यप्रदेशांत कोळशाची नवी खाण**—राष्ट्रीय कोळसा-विकास मंडळानें मध्यप्रदेशांतील सरगुजा जिल्ह्यांत एक नवी कोळशाची खाण उघडण्याचें ठरविलें आहे. ह्या खाणींतून दरसाल ५ लाख टन कोळसा काढण्यांत येईल. ह्या भागांतील कोळशाचा भूमिगत सांठा सुमारें ३ कोटी टन आहे. खाण चालू करण्यासाठी सुमारें २·६० कोटी रुपये खर्च येणार आहे.

**सरहद्दीवरील रस्त्यांची बांधणी**—नेफा व लडाख ह्या भारताच्या सरहद्दीवरील भागांत लष्करासाठी रस्ते बांधण्यासाठी दोन वर्षांपूर्वी एक संघटना स्थापन करण्यांत आलेली आहे. संघटनेनें रस्ते बांधण्याचें काम जलदीनें पुरें करावें म्हणून निकड लावण्यांत आली आहे. रस्ते बांधण्याची यंत्रसामग्री व माणसें ह्यांचा मुबलक पुरवठा करण्यांत येणार आहे.

**मध्यवर्ती सरकारी नौकरांची मालमत्ता**—मध्यवर्ती सर-कारच्या नौकरांना आतांपर्यंत दरवर्षी त्यांच्या मालकीच्या स्थावर मालमत्तेची माहितीच तेवढी सरकारला पुरवावी लागत असे. परंतु चालू वर्षापासून बँकेंतील शिल्लक, रोखे, शेअर्स, इत्यादींची माहितीहि पुरवावी लागणार आहे. पैशाच्या रूपांत लांच खाणारे सरकारी नौकर स्थावर मालमत्ता घेतच नाहींत. त्यामुळें त्यांच्या-जवळील मालमत्ता कळत नाहीं अशा तक्रारी करण्यांत आलेल्या आहेत.

**तेलाच्या नळांचा पुरवठा**—नाटो लष्करी संघटनेला जपान-तर्फे असें कळविण्यांत आलें आहे कीं, रशियाला जपान पुरवीत असलेलें तेलवहातुकीचे नळ ह्यापुढें पुरविण्यांत येणार नाहींत. मात्र पूर्वी झालेल्या करारांतील पुरवठा बंद करण्यांत येणार नाहीं. ह्या कराराप्रमाणें जपानमधील यावाटा पोलाद कंपनी रशियाला ५,००० टन वजनाचे नळ पुरविणार आहे.

**रस्त्याच्या उजव्या बाजूनें चाला**—स्वीडनच्या पार्लमेंट-मध्यें, रस्त्यामधील वाहतूक उजव्या बाजूनें करण्यांत यावी ह्यासंबंधीं एक बिल चालू वर्षी मांडण्यांत येणार आहे. हें बिल मंजूर झाल्यास फक्त ब्रिटनमधील वाहनांची वाहतूकच काय ती डाव्या बाजूनें चालू राहील; युरोपमधील बाकीच्या सर्व देशांतील वहातूक उजव्या बाजूनें चालू होईल.

**राष्ट्रीय संरक्षणनिधीला मोठी मदत**—आसाममधील एका विधवेनें राष्ट्रीय संरक्षण निधीला मदत म्हणून आपली सर्व मालमत्ता देऊन टाकली आहे. ह्या बाईंना मूलबाळ नाहीं. त्यांनीं आपली २ लाख रुपये किंमतीची सर्व मालमत्ता निधीला दिलीच; पण त्या-शिवाय २०० तोळें सोनेंहि निधीला अर्पण केलें. बाईंचें वय अवघें २८ वर्षें आहे.

## मशीन टूलसच्या उत्पादनवाढीची आवश्यकता
### श्री. शंतनुराव किर्लोस्कर ह्यांचा आढावा

इंडियन मशिन टूल्स मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशनची सोळावी वार्षिक सभा मुंबईला झाली. या प्रसंगीं भाषण करतांना संघाचे अध्यक्ष श्री. शं. ल. किर्लोस्कर यांनीं या उद्योगाच्या जलद विकासाची आवश्यकता किती तांतडीची आहे हें स्पष्ट केलें. ते म्हणाले कीं प्रतवारी केलेल्या यंत्रोपकरणांच्या उत्पादनाबाबत गेल्या वर्षी उच्चांक गाठण्यांत आला आहे. उद्योगाच्या १९४१ सालांतील स्थापनेपासून प्रथमतःच रु. ७-३३ कोटींचें उत्पादन झालें. यंत्रोपकरणांच्या आयातींत जरी वाढ झालेली आढळून येत असली तरी देशांत होणाऱ्या त्यांच्या निर्मितींतहि वाढ झाल्याचें त्यांनीं नमूद केलें.

सध्यांच्या राष्ट्रीय आणीबाणीच्या काळांत आधुनिक प्रकारच्या यंत्रोपकरणांचें उत्पादन करणें ही केवळ आवश्यक बाब नसून ती एक तांतडीची व अत्यंत महत्त्वाची गरज आहे. या संकटसमयीं राष्ट्रीय व संरक्षणात्मक गरजा भागविण्यासाठी यंत्रोपकरणांच्या उत्पादनांत शक्य तों जास्तींत जास्त वाढ करणें हें प्रत्येक यंत्रोपकरण-निर्मात्याचें राष्ट्रकर्तव्य आहे. यंत्रोपकरणांच्या उत्पादनांत वाढ करण्यासाठी व त्यांच्यांत विविध प्रकारांची भर घालण्यासाठी सदैव झटत रहायला हवें. सरकारला यंत्रोपकरण उद्योगाच्या विकासाची आवश्यकता पटविण्याचें काम हा संघ गेलीं पंधरा वर्षे करीत आहे. परंतु दुर्दैवानें सरकारकडून या उद्योगाला प्रोत्साहन तर मिळालें नाहींच; उलट जुन्या यंत्रांच्या आयातींना परवानगी देण्यांत आली. सरकारनें या उद्योगाला आर्थिक मदत देण्याऐवजीं दोन सरकारी कारखान्यांत मोठ्या रकमा गुंतविल्या. आजपर्यंत जें धोरण अवलंबिण्यांत आलें तेंच जर पुढें चालू ठेवण्यांत आलें तर या धंद्याच्या आणीबाणीच्या काळांत आवश्यक असा विकास घडून येणार नाहीं.

यंत्रोपकरण-उद्योगाच्या विकासाला जास्त कालावधीची गरज आहे याची जाणीव असल्याचें सांगून संघाचे सभासद व इतर उद्योगपति यांनीं जास्तींत जास्त उत्पादन काढावें असें त्यांनीं आवाहन केलें. या उद्योगाचा विकास होण्यासाठी त्यांत नवनवीन उद्योगपतींचा शिरकाव होण्याची गरज असल्याचें सांगून या नवीन लोकांना या उद्योगाकडे कसें आकृष्ट करतां येईल, याविषयीं त्यांनीं कांहीं सूचना केल्या. या उद्योगाच्या करमाफीच्या काळांत ५ वर्षांवरून १० वर्षांपर्यंत वाढ करावी, नफ्याचें प्रमाण ६ टक्क्यांवरून १२ टक्क्यांवर न्यावें, अशा त्यांच्या कांहीं सूचना होत्या. या उद्योगाला कंपनी कायदा आणि भांडवल उभारणी यांसंबंधींचे नियम लावूं नयेत किंवा ते शिथिल करावेत असेंहि त्यांनीं सुचविलें.

युद्धकाळांत युद्धसाहित्याचा तुटवडा थोडक्या वेळांत भरून काढण्यासाठी तें साहित्य तयार स्वरूपांत मिळविलें पाहिजे हें जरी खरें असलें तरी या साहित्याचें देशांतच उत्पादन करणें योग्य ठरतें. तथापि, अशा प्रकारचें युद्धसाहित्य निर्माण करण्यासाठी जीं साधनें व उपकरणें आवश्यक असतात, त्यांचें उत्पादन सुरू करणें आवश्यक आहे, असें श्री. किर्लोस्कर यांनीं आपल्या भाषणांत स्पष्ट केलें.

---

### हिंदी जवानांसाठी मद्य

भारताच्या सरहद्दीवरील हिंदी सैनिकांना मद्याची अतिशय आवश्यकता असते. हिमालयाच्या परिसरांतील आघाडीवर मद्याशिवाय त्यांचें चालणार नाहीं. राजस्थानमधील गंगासागर साखर कारखान्यानें हिंदी जवानांसाठी ५०० गॅलन मद्य पुरविण्याचें ठरविलें आहे.


**BANKERS PRACTICAL TRAINING COURSE**

**Seventh Batch**

Admissions to Bank Employees and persons desirous to enter into Bank Service.

Duration : 3 months.

Date of Commencement : 4th February 1963.

Enquire at : The Deccan Institute of Commerce
717 Budhwar, POONA-2.
(Tel. No. 22360.)

**कण आणि क्षण**

लेखकः—श्री. वा. काळे

ह्या पुस्तकाच्या तिसऱ्या आवृत्तीची छपाई पूर्ण झाली असून पुस्तक लवकरच प्रसिद्ध होईल.

: प्रकाशक :

व्हीनस प्रकाशन,
३८१ क, शनवार पुणें २.

**तुमच्या अभ्युदयाच्या मार्गावरील महत्त्वाचा दुवा**

**दि बेळगांव बँक लिमिटेड**

( शेड्यूल्ड बँक )

मुख्य कचेरी—रविवार पेठ, बेळगांव

स्थापना—१९३०

महाराष्ट्र आणि म्हैसूर राज्यांतील आपल्या २८ शाखांतर्फे आपली सेवा बजावीत आहे. ३० वर्षांहून अधिक काळाचा अनुभव आणि आणखी प्रगतीचे अविरत प्रयत्न यांमुळें ग्राहकांचें अधिकांत अधिक हित साधणारी ही बँक तुमच्याहि भरभराटीला योग्य हातभार लावेल. सर्व प्रकारचीं डिपॉझिट्स्, कर्जे, वसुली व सर्व व्यापारी कामें, बँक गॅरन्टी, सॉल्व्हन्सी दाखले, शेअर्यांची खरेदी-विक्री, इत्यादि कामांशिवाय अधिक व्याज मिळवून देणाऱ्या बँकेच्या कांहीं खास योजना.

माहितीसाठी आपल्या जवळच्या शाखेला त्वरित भेट द्या अगर मुख्य कचेरीस त्वरित लिहा.

श्री. बी. बी. पोतदार, बी. ए., एलएल. बी., चेअरमन.
श्री. ए. आर. नाईक, बी. ए., बी. एससी., एलएल. बी., मॅनेजिंग डायरेक्टर.

# अर्थ

बुधवार, ता. ६ फेब्रुवारी, १९६३





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## शास्त्रीय ज्ञानामुळें घडून येणारी नवी औद्योगिक क्रांति

आधुनिक जगांतील शास्त्रीय व तांत्रिक ज्ञानाच्या व्यावहारिक उपयोगाकडे लक्ष पुरविणारी एक उपसंघटना संयुक्त राष्ट्र संघटनेनें स्थापन केलेली आहे. ह्या संघटनेचें नांव कॉन्फरन्स ऑन दि अप्लिकेशन ऑफ सायन्स अँड टेक्नॉलजी असें असून तिची बैठक जिनीव्हा येथें चालू झाली आहे. बैठकीपुढील कार्याची कल्पना येण्यासाठी म्हणून संयुक्त राष्ट्र संघटनेच्या तज्ज्ञांनीं एक पुस्तिका तयार केली आहे. पुस्तिकेंत दिलेली माहिती उद्बोधक असून गेल्या १० वर्षांतील विकासकार्याचें प्रचंड स्वरूप तीवरून लक्षांत येतें. जगाच्या एकूण लोकसंख्येपैकी सुमारें एक पंचमांश लोकांना अजूनहि पोटभर अन्न मिळत नाहीं. अशा लोकांची संख्या ५० कोटींच्या आंतबाहेर असून आणखी १०० कोटी लोकांना मिळणारें अन्न निकृष्ट दर्जाचें असतें. ह्यावरून अन्नपदार्थांच्या निर्मितीमधील वाढीचें महत्त्व लक्षांत येतें. लोकसंख्येची वाढ झपाट्यानें होत असल्यामुळें दरसाल २ कोटी नव्या बिऱ्हाडांच्या जागा बांधणें आवश्यक आहे. आरोग्य आणि सार्वजनिक स्वच्छता ह्या बाबींवर सध्यांपेक्षा १० ते १५ टक्के अधिक खर्च करणें जरूर आहे. नाहींतर रोगांच्या सांथी उद्भवण्याची व पसरण्याची शक्यता आहे. येत्या दहा वर्षांच्या काळांत जगांतील औद्योगिक उत्पादनांत १३० टक्के वाढ होणें अगत्याचें आहे. औद्योगिक उत्पादनांतील वाढीसाठी औद्योगिक शक्तीच्या पुरवठ्यांत सुधारणा झाली पाहिजे हें ओघानेंच आलें. विशेषतः औद्योगिक दृष्ट्या मागासलेल्या देशांतील औद्योगिक शक्तीच्या पुरवठ्यांत त्वरित वाढ झाली पाहिजे. ही वाढ करण्यासाठी दरसाल २०० कोटी डॉलर्सची गुंतवणूक करावी लागणार आहे.

नवीन शास्त्रिय शोधांमुळें आणि त्याच्या व्यावहारिक उपयोगामुळें आगामी १० वर्षांत सर्व जगांत एक नवीनच औद्योगिक क्रांति होऊं घातली आहे. सुमारें २०० वर्षांपूर्वी पश्चिम युरोपांत पहिली औद्योगिक क्रांति झाली. तथापि आतां होऊं पाहणाऱ्या औद्योगिक क्रांतींत आणि पहिल्या औद्योगिक क्रांतींत पराकाष्ठेचा फरक आहे. पहिली औद्योगिक क्रांति ही मुख्यतः कारखान्यांत झाली आणि कुशल कामगार वर्गावर ती अवलंबून होती. ह्याच्या उलट आज होणारी क्रांति मूलतः विद्यापीठांतून आणि संशोधन संस्थांतून उदयास आली आहे. ह्या क्रांतीची धुरा कुशल कामगारांवर नसून निरनिराळ्या विषयांतील शास्त्रीय तज्ज्ञ आणि तंत्रज्ञ ह्यांच्यावर आहे. पहिली औद्योगिक क्रांति व्यक्तिनिष्ठ होती. नवीन क्रांति आपल्या कार्यासाठी हेतुपूर्वक काम करणाऱ्या व्यक्तींच्या सांघिक प्रयत्नावर अवलंबून आहे. शिवाय अलीकडील शास्त्रीय ज्ञानामुळें लोकांच्या संवयीवर व वृत्तीवर इतका परिणाम झाला आहे कीं, त्यांचें स्वरूपच आमूलाग्र बदललें आहे. ही क्रांति अविकसित देशांच्या दृष्टीनें अधिक महत्त्वाची आहे. कारण औद्योगिक प्रगतीचे अधिक जवळचे मार्ग आतां उपलब्ध झाले आहेत. शास्त्रज्ञ हा आतां केवळ सत्याचा शोध करणारा एकाकी 'प्राणी' राहिलेला नाहीं. त्याच्या शोधाला रोजच्या जीवनांत महत्त्व प्राप्त झालें आहे. उदाहरणार्थ, नायलॉनची मच्छीमारीसाठी लागणारी जाळी इतर जाळ्यांपेक्षा अधिक टिकाऊ असतात. त्यामुळें ब्राझिलमधील मच्छीमारीच्या धंद्याचा उत्पादन-खर्च कमी झाला आहे. शिवाय हीं जाळीं माशांना दिसत नाहींत. त्यामुळें मच्छीमारीचा व्यवसाय आतां दिवसाहि करतां येऊं लागला आहे. नेहमींच्या जाळ्यांनीं हें शक्य होत नाहीं.

## कृत्रिम रबराच्या उत्पादनाचा कारखाना

गेल्या दहा-बारा वर्षांच्या अवधींत भारतामधील उद्योगधंद्यांत रबराचा खप वाढत चाललेला आहे. बारा वर्षांपूर्वी रबराचा जितका खप होत होता त्याच्या तिप्पट म्हणजे सुमारें ६७,००० टन रबर आतां दरसाल लागूं लागलें आहे. पण त्या मानानें रबराच्या उत्पादनांत होत असलेली वाढ मंद गतीची आहे. १९५० सालीं भारतामधील नैसर्गिक रबराचें उत्पादन सुमारें १६,००० टन होतें, तें १९६२ सालीं जेमतेम २८,००० टनांपर्यंत वाढलें आहे. रबराचें देशांतर्गत उत्पादन व खप ह्यांच्यांत जी तफावत आहे ती अर्थातच रबराची आयात करून भरून काढावी लागते. ह्या आयातीमुळें बऱ्याच मोठ्या रकमेच्या परदेशीय चलनाला साहजिकच मुकावें लागतें. म्हणून उत्तर प्रदेशांत बरेली येथें काढण्यांत येत असलेल्या कृत्रिम रबराच्या कारखान्याला साहजिकच विशेष महत्त्व आहे. ह्या कारखान्याच्या उभारणीचें काम पूर्ण होत आलें असून त्यांत लवकरच उत्पादनाला प्रारंभ होईल. कारखान्यांत दरसाल ३०,००० टन कृत्रिम रबर निर्माण करण्यांत येणार आहे. भारतांत आजच दरसाल सुमारें १०,००० टन कृत्रिम रबराचा वापर करण्यांत येत आहे. कृत्रिम रबर हें नैसर्गिक रबराइतकेंच उपयुक्त असून त्यापेक्षा कांहींसें स्वस्तहि आहे. भारताची रबराची गरज वाढत जाणारी आहे. त्यांतच आतां संरक्षणविषयक गरजांची भर पडली आहे. त्यामुळें कृत्रिम रबराचे अधिक कारखाने निघाल्यास त्यांनाहि वाव मिळण्यासारखी परिस्थिति आहे. रबराच्या झाडांची भारतामधील लागवड तुटपुंजी असून ह्या झाडांपासून रबरहि बेताचेंच मिळतें.

## पाकिस्तान चीनकडून कोळसा घेणार

पाकिस्तान आणि चीन ह्यांच्या दरम्यान होणारा व्यापार वाढविण्यासाठी उभय देशांच्या दरम्यान बोलणीं चालू असून लवकरच त्यांच्यांत एक व्यापारी करार करण्यांत येण्याची शक्यता आहे. हा करार बहुधा ऐनजिनसी देवघेवीचा होईल. एकमेकांच्या गरजा समजावून घेण्यासाठी उभयता देशांचीं व्यापारीमंडळें जाणार आहेत. सध्यां पाकिस्तान भारताकडून कोळसा घेत असतो. परंतु हा करार झाल्यावर भारताकडून आयात करण्यांत येणाऱ्या कोळशांत कपात करून पाकिस्तान चीनकडून अधिक कोळसा घेऊं लागणार आहे. रशियानेंहि पाकिस्तानशीं होणारा व्यापार वाढविण्यासाठी पाकिस्तानच्या सरकारला कांहीं सूचना पाठविल्या आहेत. त्यांचा अभ्यास चालू आहे.

## कोलारच्या सोन्याच्या खाणींचें भवितव्य

### तोटा किती काळ सोसणार ?

मध्यवर्ती सरकारकडे मालकी गेल्यानंतरची कोलार खाणींच्या व्यवस्था-मंडळाची पहिली सभा २७ जानेवारी रोजीं अर्थमंत्री श्री. मुरारजी देसाई ह्यांच्या अध्यक्षतेखाली भरली होती. त्या वेळीं त्यांनीं खाणींतील सोन्याच्या उत्पादनाला दर औंसास ३८७ रु. एवढा खर्च येतो, ह्याबद्दल आश्चर्य व्यक्त केलें. सोन्याची इं. मो. फंडानें निश्चित केलेली आंतरराष्ट्रीय किंमत फक्त १६७ रु. औंस एवढीच आहे ! जास्त सोनें असलेलीं खनिजें शोधून काढण्याचें आणि काटकसरीनें उत्खनन करण्याचें त्यांनीं आवाहन केलें. ह्या दोन्ही गोष्टी अशक्यच दिसतात. ह्या खाणींतील सोनेंमिश्रित दगडांत प्रत्येक टनामागें ७·०७ पेनी वजनाइतकें सोनें १९५२ मध्यें आढळत असे. १९६०-६१ मध्यें तें प्रमाण ४·८१ पेनी वजनाइतकें खाली उतरलें. ह्याच मुदतींत हिंदी बाजारांतील सोन्याची किंमत कृत्रिम कारणांमुळें २७५ रु. औंसांची ३५९ रु. औंस झाली, म्हणूनच कोलारच्या खाणी चालू राहूं शकल्या, अशी वस्तुस्थिति आहे. मग सरकारनें त्या खाणींचें राष्ट्रीयीकरण करून काय मिळविलें ? कोलारच्या खाणींतील उत्खनन गेलीं ८० वर्षे चालू आहे आणि जगांतील खाणींत त्या सर्वांत खोल आहेत. १९८०-९० च्या नंतर आणखी सोनें सांपडण्याचा संभव नाहीं. सोन्याच्या उत्पादनाला ४·९१ कोटी रु. खर्च आला आणि त्याची आंतरराष्ट्रीय किंमत २·३४ कोटी रु. भरली, असा आंतबट्ट्याचा व्यवहार १९६०-६१ मध्यें झाला. म्हणजे, अर्थमंत्र्यांच्या कल्पनेप्रमाणें सोन्याचा भाव उतरला, तर कोलारच्या खाणी बंदच कराव्या लागतील आणि कामगारांचीं १०,००० कुटुंबें बेकार होतील. कोलारच्या खाणींतील सोनें सरकारनें स्वतःच्या संग्रहीं ठेवण्यापेक्षा तें बाजारांत विकून टाकणें सोईचें झालें असतें. सोन्याप्रमाणें इतरहि कित्येक जिनसांच्या आयातीस बंदी आहे आणि त्या सर्व जिनसांच्या भारतांतील किंमती परदेशांतील किंमतीपेक्षा भारी आहेत. सहाजीकच, त्यांच्या चोरट्या आयातीस उत्तेजन मिळतें. आयातीवरील आणि परदेशी हुंडणावळीवरील निर्बंध दूर केले म्हणजे किती उद्योगधंद्यांचा पाया कच्चा असूनहि ते संरक्षित बाबारपेठेच्या छायेंत मोठे नफे कसे कमावीत आहेत हें दिसून येईल; परंतु, सोन्यामागें लागलेल्या अर्थमंत्र्यांची संक्रांत कोलारच्या खाणींकडे वळण्याची साधार भीति आहे. खाणी तोट्यांत चालल्या ( तो तोटा सरकारलाच सोसावा लागणार ) तरी त्या चालू ठेवण्याचा आग्रह खाणीकामगारांच्या हिताच्या दृष्टीनें केला जाईल, हें उघड आहे.

---

### अणुशक्तीवरील वीज स्वस्त होईल

अणुशक्ति मंडळाचे अध्यक्ष डॉ. भाभा अहमदाबाद येथें बोलतांना म्हणाले कीं कोळशाच्या अगर तेलाच्या जळणाच्या साह्यानें उत्पन्न करण्यांत येणाऱ्या विजेपेक्षा अणुशक्तीच्या साह्यानें उत्पन्न करण्यांत येणारी वीज अखेरीस स्वस्त होईल. ह्याचें कारण असें कीं कोळसा अगर तेल ह्यांची आयात करावी लागते. शिवाय त्यांची वाहतूकहि लांबलांबच्या ठिकाणांहून करावी लागते. अर्थातच त्यांच्या किंमती वाढतात. उदाहरणार्थ, गुजरात अगर महाराष्ट्र राज्यांतील उद्योगधंद्यांना लागणारा कोळसा ६०० पासून १,२०० मैलांपर्यंत वाहून आणावा लागतो. अणुवीज निर्मिति केंद्रांना सुरवातीला भांडवली खर्च मात्र मोठा लागतो.

---

**संयुक्त राष्ट्रसंघटनेचें येणें**—१९६३ च्या प्रारंभीं संयुक्त राष्ट्रसंघटनेचे सभासद-देशांकडून १२·१ कोटी डॉलर्स इतकें येणें होतें. कांगोचें एकीकरण करण्यासाठी संघटनेनें चालविलेल्या लष्करी कारवाईपोटीं ७·६ कोटी डॉलर्स येणें असून गाझामधील शांततारक्षक सैन्यदलाच्या खर्चापोटीं ३·९ कोटी डॉलर्स वर्गणी येणें आहे. सैन्यदलांत ५,०३० सैनिक आहेत.

**चीनची संकल्पित विमान-खरेदी**—ब्रिटिश ओव्हरसीज विमान कंपनीनें ' ब्रिटानिआ ' जातीचीं १४ विमानें विक्रीला काढलीं असून चीन तीं घेण्याचा विचार करीत आहे. विमानांची पहाणी करण्यासाठी चिनी विमान-तज्ज्ञांचें एक मंडळ लंडनला गेलें आहे. त्यांना एक विमान दाखविण्यांत आलें असून तांत्रिक माहिती पुरविण्यांत आली आहे.

**केरळमधील बेकारी**—केरळ राज्यांतील बेकारीचा अंदाज घेण्यासाठी एक नमुना पहाणी करण्यांत आली आहे. ह्या पहाणीवरून असें दिसतें कीं, १९६२ च्या आरंभीं राज्यांत ८,९०,००० लोक रोजगारीच्या शोधांत होते. योग्य काम मिळाल्यास तें करण्याची तयारी असलेल्या स्त्रियांची संख्या २,७०,००० होती.

**तंजावर जिल्ह्यांत सुताची गिरणी**—तंजावर जिल्ह्यांत सुताची पहिलीच गिरणी उभारण्यांत येत आहे. इमारतीचें काम पुरें झालें असून यंत्रसामग्री बसविण्यांत येत आहे. गिरणींत सूत कातणाऱ्या १२,००० चात्या बसविण्यांत येतील. प्रथम फक्त मध्यम जाडीचें सूत काढण्यांत येईल. प्रत्यक्ष उत्पादनास आरंभ होण्यास अद्याप तीन महिने लागतील.

**परदेशीय चलनासाठी केळ्यांची निर्यात**— भारताकडून ४,००० टन वजनाचीं केळीं प्रयोग म्हणून आयात करण्याचें रशिआनें कबूल केलें आहे. ही निर्यात केळीं पिकविणाऱ्या बागाइतदारांच्या सहकारी संस्थांमार्फत करण्यांत येईल. ह्यासाठी केरळ राज्यांत सहकारी संस्था काढण्याचें केरळच्या मुख्य मंत्र्यांनीं ठरविलें आहे. केळ्यांच्या ह्या निर्यातीमुळें भारताला २८ लाख रुपयांचें रुबलखर्चे परदेशीय चलन मिळेल.

**काथ्याच्या चटयांचा यांत्रिक कारखाना**—केरळच्या काथ्याच्या उद्योगधंद्याच्या बोर्डानें यंत्राचा वापर करून काथ्याच्या चटया विणण्याचा कारखाना काढण्याचा निर्णय घेतला आहे. ह्या कारखान्यासाठी अद्ययावत् पद्धतीची यंत्रसामग्री वापरण्यांत येणार असून तीसाठी १० लाख रुपये लागतील असा अंदाज आहे. मॉस्को येथें येत्या जुलैमध्यें भरविण्यांत येणाऱ्या भारतीय मालाच्या प्रदर्शनांत बोर्ड भाग घेणार आहे.

**शस्त्रास्त्रांच्या कारखान्यासाठी मदत**—झेकोस्लोव्हाकिआच्या यांत्रिक हत्यारांच्या व्यापाराचे प्रमुख भारताच्या दौऱ्यावर आले होते. शस्त्रास्त्रांचे कारखाने काढण्यासाठी भारतानें झेक देशाकडे मदत मागितल्यास त्याबद्दल आस्थापूर्वक विचार करण्यांत येईल असें त्यांनीं सांगितलें. झेकोस्लोव्हाकिआनें संयुक्त अरब प्रजासत्ताकाला असे कारखाने काढण्यास मदत केली आहे.

**बंगलोर येथील घड्याळांचा कारखाना**—हिंदुस्थान मशीन टूल्स ह्या सरकारी मालकीच्या कारखान्यांतील घड्याळांच्या कारखान्यांत आतां घड्याळें बनविण्याचें काम सुरू झालें आहे. आतांपर्यंत कारखान्यांत घड्याळें जुळविण्याचें काम होत असे. कारखान्यांत तयार करण्यांत येणाऱ्या घड्याळांत पहिल्या वर्षी ५४ टक्के भाग देशी बनावटीचे असतील. चौथ्या वर्षांत हें प्रमाण ८४ टक्के होईल.

# चलनवाढीच्या दुष्परिणामाकडे वेळींच लक्ष द्या

## आर्थिक विकास व स्थैर्य ह्यांचे मार्गांतील धोंड

जागतिक बँकेच्या शिष्टमंडळाचे सदस्य डॉ. बर्नस्टेईन यांनीं आपल्या अहवालांत तुटीचा अर्थसंकल्प आणि चलन फुगवटा यामुळें असलेल्या धोक्याकडे प्रकर्षानें लक्ष वेधलें होतें. पुरेशा साधनसामग्रीच्या अभावाचा जो प्रश्न आहे तो किंमतनियंत्रण आणि वांटप ( रेशनिंग ) यांच्या बरोबरीनें भरपूर द्रव्य उपलब्ध ठेवून सुटण्यासारखा नाहीं. या गोष्टी सर्वंकष प्रमाणांत आणि शांतताकाळांत दीर्घ मुदतीपर्यंत यशस्वीपणें लादतां येतील असें गृहीत धरून चालणें शक्य नाहीं. तें शक्यहि होऊं शकणार नाहीं. नियंत्रणामुळें नासधूस, लवचितकता, शून्यता आणि उत्पादन-प्रक्रियतले बिघाड या मार्गानें आर्थिक नुकसानीचा संभव निर्माण होतो. या गोष्टी दीर्घकाळपर्यंत चालू राहिल्या तर श्रमाची प्रेरणा कमी होऊ लागते आणि मूल्य घटलेल्या द्रव्याच्या बदली माल पुरविण्यास इच्छा उरत नाहीं. असेरीस विकासासाठी लागणारें आर्थिक बळ व लागणारीं साधनें हीं कर, बचत आणि जनतेचें चालू उत्पन्न यांतूनच यावयास हवीत अथवा परदेशांतून तरी ही व्यवस्था झाली पाहिजे. अपुऱ्या साधनसामग्रीच्या या प्रश्नाला प्रत्येक विकासशील राष्ट्रानें तोंड दिलें पाहिजे. दृश्य स्वरूपांत आणि आपली कर्तबगारी दाखवीत असलेल्या चलन-फुगवटयाला टाळण्यासाठी खूप पैसा उपलब्ध करून आणि आधारासाठी त्याला नियंत्रणाचे टेकू देऊन हा प्रश्न छपून ठेवणें शक्य होणार नाहीं.

पंचवार्षिक योजनांमुळें भारतांत जी परिस्थिति निर्माण होत आहे व तुटीच्या अर्थसंकल्पाकडे आणि चलन-फुगवट्याकडे जी वाटचाल चालू आहे तीमुळें सरकार आणि जनता यांना चिंता वाटू लागली आहे. विविध आर्थिक हालचालींवरून भारतीय अर्थ-व्यवस्था खर्चं फुगवटयाच्या अवस्थेतून जात आहे असें दिसेल. पुरेशी साधनसामग्री नसूनहि गुंतवणुकींत जी मोठ्या प्रमाणांत वाढ होत आहे, तीमुळें कराव्या लागणाऱ्या तुटीच्या अर्थसंकल्पाचा हा परिणाम होय. सालोसाल अर्थ-संकल्पांत तूट येत असते, ती याच कारणानें. पंचवार्षिक योजनांमध्यें वाढत्या लोकसंख्येला आणि वाढत्या उत्पन्नाला साजेशा प्रमाणांत उपभोग्य वस्तूंचा पुरवठा करणें या गोष्टींकडे यायला पाहिजे तसें लक्ष दिलें गेलेलें नाहीं. उत्पादनवाढीचें नियोजन करण्याइतकीच हीहि बाब महत्त्वाची आहे. एरवीं सततच्या चलन-फुगवट्यामुळें उपभोग्य वस्तूंच्या किंमतींत त्या पटीनें वाढ होऊं लागते. चोर पावलानें येणाऱ्या चलन फुगवटयाच्या अवस्थेतून भारत आतां उघड उघड चलन फुगवटयाच्या अवस्थेकडे पाऊल सरकत आहे. या नव्या परिस्थितीमुळें आपल्या शासन-यंत्रणेच्या साहाय्यानें सरकार नियंत्रणें घालून चलन-फुगवटयाला मार्गे रोखण्याचा प्रयत्न करूं लागले आहे. रोखलेल्या चलन फुगवटयाचें प्रमुख लक्षण म्हणजे सरकारी शासनच किंमत ठरविणारी यंत्रणा बनल्यानें, बाजारांतील उपभोग्य वस्तूंचें वितरण आणि किंमती, तसेंच बाजार आणि उत्पादनाचा अंक यांतील दुवा नष्ट होतो हें आहे. रोखलेली चलनवाढ नियंत्रणाच्या साहाय्यानें जनतेला उपभोग्य वस्तूंपासून वंचित करते; आणि जरी यामुळें बचत झाली तरी बचतीचें स्वरूप बदलतें. ही सांचलेली बचत किंमतींत कमी होत जाऊन रोडावूं लागते.

किंमत नियंत्रण आणि वांटप ( रेशनिंग ) यांचा प्रयोग मुक्त समाजव्यवस्थेंत आप-करणींनेंच कुचकामी असून त्यामुळें उपभोग्य वस्तूंच्या उपभोगाला मर्यादा निर्माण करण्यासहि या गोष्टी असमर्थ आहेत असें अनेक निःपक्षपाती अर्थतज्ज्ञांचें मत आहे. थोड्या काळापुरती जरी या उपायांनीं यशप्राप्ति होत असली तरी अखेरीस त्यांचा परिणाम होत नाहींसा होतो. असल्या शासकीय उपाययोजनांनीं थोड्याच अवधींत खपाला फुगवटा येतो. आज ज्यावर खर्च केला पाहिजे अशी स्थिति नसलेल्या उद्योगावर भांडवली खर्च करावा लागतो. सुवर्णसांठा करण्याची प्रवृत्ति वाढते, भांडवल अन्य देशीं पळूं लागते व अशा रीतीनें नियोजनासाठी आवश्यक असलेल्या साधनांची उपलब्धता कमी होऊन आर्थिक प्रगतीची गति मंदावते. जास्तींत जास्त आर्थिक विकास होण्यासाठी नाणेंविषयक आणि किंमतीविषयक स्थैर्य या आवश्यक अशा गोष्टी अगोदर निर्माण करावयाच्या गोष्टी आहेत.

विकासाच्या कामांसाठी चलन फुगवटयाला कारण होणारा पैसा वापरला कीं त्याची प्रतिक्रिया एखाद्या माळेप्रमाणें जाणवू लागते व त्यांतून फाजिल चलन फुगवटा निर्माण होतो. किंमती वाढतील, नियोजनाचा खर्च जास्त येईल, अधिक पैसा खर्च करावा लागेल व त्यामुळें फुगवटयांत आणखी भर पडेल. नियंत्रणामुळें जनतेमध्यें उर्वरित स्वरूपाची क्रयशक्ति सांचून राहील. आयातींत वाढ व निर्यातींत घट या दोहोंतील तफावतीचें संकट या गोष्टी चलन फुगवटयाचाच सरळ परिणाम होय. परकीय मदत आणि परकीय कर्जे यामुळें सरकारी खर्चांत भर पडून चलन फुगवट्यालाहि आणखी बाळसें चढतें.

चलन फुगवट्यावरील चर्चेत "ॲफ्लुएंट सोसायटी" या लिखाणांत प्राध्यापक गालब्रेथ यांनीं पुढील सनसनाटीपूर्वक निष्कर्ष काढला आहे. ते म्हणतात, " साथीच्या रोगासारख्या या चलन फुगवट्याच्या युगांत, बाजारांत शिक्षक, धर्मोपदेशक अथवा पोलिस म्हणून वावरण्यापेक्षां एखादा सटोडिया अथवा एखादी वेश्या म्हणून राहणें केवळ अर्थाचाच विचार केला असतां अधिक फायदेशीर ठरेल. "

चलन फुगवटयाची ही दुःखान्तिका भूतकाळांत अनेक राष्ट्रांमध्यें घडून आलेली आहे. शेअर बाजारांतील सौदेबाजी क्रमशः अन्नधान्यें आणि तत्सम संपत्तीतहि होऊं लागते आणि तिची अखेर जमिनीच्या किंमतींत सौदेबाजी होण्यांत होते. याचा परिणाम सर्व अर्थव्यवस्थेवर होतो व मावा पडल्यासारखी ती रोगट होते. समाजांतील फार मोठ्या विभागाला कष्टमय जीवन मिळण्यांत या सर्व गोष्टींची परिणति होत असते. चलन फुगवट्याचा रेटा, खुप वाढलेलें कर, वस्तूंची भीषण टंचाई व सर्वच बाबतींत लादलीं गेलेलीं नियंत्रणें यांच्यामुळें सामान्य माणूस निराशेच्या कांठाकडे लोटला जात आहे. वेळेवरच उपाययोजना जर झाली नाहीं तर चलन फुगवट्याच्या या वावटळीचें फाजिल चलन फुगवटयांत रूपांतर होण्याला फार वेळ लागणार नाहीं. तुटीचा अर्थसंकल्प, परकीय मदत व प्रचंड स्वरूपांतली गुंतवणूक यांवर आधारलेल्या पंचवार्षिक योजनेमुळें जी सर्वसाधारण भाववाढ होण्याची अपेक्षा केली जाते तीमुळें चलन फुगवटयाचें मानसशास्त्र निर्माण होत आहे. ही जी भाववाढ अपेक्षित आहे तिच्यामुळें प्रत्येकजण नाण्याचें रूपांतर वस्तूंत करण्यासाठी धडपडूं लागेल व त्याचा परिणाम वस्तूंची टंचाई निर्माण होण्यांत होईल. सरकारहि अधिक कडक नियंत्रणें लादूं लागेल व रोगांवर इलाज करण्याचे सोडून रोगाच्या लक्षणांनाच मलमपट्टी करण्याचा प्रयत्न करील. भारतांत जी चलनवाढ आज होत आहे ती आर्थिक विकास व स्थैर्य यांच्या मार्गांतली एक फार मोठी धोंड आहे.

चलन फुगवट्याची जर महान् आपत्ति टाळावयाची असेल तर सरकारनें आपल्या धोरणांत बदल करून जनतेजवळच्या साधनांच्या प्रमाणांत खर्च वाढविण्याचें बंधन घालून घेतलें पाहिजे आणि वास्तव असें आर्थिक धोरण स्वीकारलें पाहिजे. योजना सुटसुटीत हवी, साधनें नसलेली अगडबंब स्वरूपाची नसावी; तरच हें कायमचें संकट टाळणें शक्य होईल. रुपयाची क्रयशक्ति ज्या प्रमाणांत कमी झाली आहे, त्या प्रमाणांत त्याची दर्शनी किंमत अवमूल्यिन करण्यांत आली पाहिजे. आपल्या हातीं असलेलीं सर्व नाणेविषयक शस्त्रें आपण वापरू असा निर्धार करण्याचें सोडून चलन फुगवट्याला कारणीभूत होणारें धोरण आगावू जाहीर करण्यांत येतें. यांत सुधारणा झाली पाहिजे. नाणेविषयक धोरण आणि त्या संबंधांत उपयोगांत आणले जाणारे उपाय हे स्वयंसिद्ध आहेत आणि सरकारनें ठरविलेल्या उद्दिष्टांना ते योग्य मार्गानें नेण्यासाठी त्यावर विसंबून राहण्यास हरकत नाहीं अशी परिस्थिति उरलेली नाहीं. देशाच्या सर्वसाधारण प्रगतीला जुळेल व जुळवून घेईल असेंच नाणेविषयक धोरण आणि उपाय असावे लागतात.

कितीहि निराशा वाटली तरी चलन फुगवटा बैल गेला नि झोपा केला अशी परिस्थिति निर्माण होण्यापूर्वीच थांबविण्याचा निर्धार बळकट करण्याचें कांहीं झालें तरी प्रयत्न करायलाच हवेत. चलन फुगवट्याच्या मार्गानें द्रव्यपुरवठ्याचा मार्ग अतिशय घातक आहे. कारण त्यामुळें जनतेच्या नैतिक आणि भौतिक मूल्यांचा ऱ्हास होतो आणि नियोजनाचें उद्दिष्ट अशा रीतीनें पराभूत होतें.

## शस्त्रक्रियेसाठीं लागणाऱ्या हत्यारांचा कारखाना

शस्त्रक्रियेसाठी लागणाऱ्या उपकरणांचा व हत्यारांचा एक कारखाना मद्रास येथें रशियाच्या आर्थिक व तांत्रिक सहकार्यानें काढण्यांत येत आहे. कारखान्याच्या उभारणीसाठी ६ कोटी रुपये भांडवल लागणार आहे. त्याची उभारणी १९६५ च्या मध्याच्या सुमारास पूर्ण होणार होती. परंतु, आतां उभारणीचें काम निकडीनें करण्यांत यावयाचें ठरल्यानें १९६४ च्या मध्याला कारखाना उत्पादनक्षम होईल असा अंदाज आहे. उभारणीच्या कामांत मदत करण्यासाठी ३१ रशियन एंजिनिअरांची एक तुकडी लवकरच मद्रास येथें येणार आहे. फेब्रुवारी महिन्यापासून कारखान्यासाठी लागणारी यंत्रसामग्री येऊं लागेल असा अंदाज आहे. कारखान्यातर्फे ३५ हिंदी इंजिनिअर्सना शिक्षणासाठी रशियांत पाठविण्यांत येणार आहे. पहिली हिंदी तुकडी मार्चमध्यें रवाना होईल व त्यानंतर दर तीन महिन्यांनीं पुढील तुकड्या पाठविल्या जातील. उत्पादन सुरू झाल्यावर पहिल्या वर्षी कारखाना ३ कोटी रुपयांची शस्त्रक्रियेसाठी लागणारी सामग्री तयार करू लागेल. प्रारंभीं मूलभूत स्वरूपाचीं हत्यारें तयार करण्यांत येतील. पुढें हळूहळू खास प्रकारचीं उपकरणें तयार करण्यांत येऊं लागतील. एकूण सुमारें १५० प्रकारांचीं हत्यारें व उपकरणें तयार करण्यांत येतील. कारखाना उत्पादन करू लागल्यावरहि भारताला आपली ३० टक्के गरज आयातीनें भागवावी लागेल. कारखान्यांत १२०० कामगारांना रोजगार मिळू शकेल. त्यांची राहण्याची सोय करण्यासाठी ७०० घरांची वसाहत स्थापन करण्यांत येत आहे. कारखान्यासाठी २० लाख रुपये खर्चाची पाण्याची सोय करण्यांत येत आहे.

## " भारतमित्रा " चें अभिनंदन

रिवण ( गोवा ) येथें प्रसिद्ध होत असलेल्या भारतमित्र मासिकाचा जानेवारी, १९६३ चा अंक हा त्या मासिकाच्या ३५ व्या वर्षाचा पहिला अंक आहे. गोव्यांतील आणीबाणीच्या काळांतहि भारतमित्र नियमित येत असे. इकडे प्रसिद्ध होणारीं पुस्तकें आस्थेनें मागवून घेऊन त्यांचा गोव्यांतील मराठीच्या अभिमान्यांना परिचय करून देण्याचें कार्य भारतमित्रानें सतत चालविलें आहे आणि आपलें नांव यथार्थ केलें आहे. भारतमित्र आतां भारताचाच झाला आहे. आम्हीं ह्या विशेषांकाचे निमित्तानें संपादक श्री. ना. भा. नायक ह्यांचें मनःपूर्वक अभिनंदन करतों.

## विवाह केला, म्हणून नोकरी जाणार नाहीं

अविवाहित नोकरदार मुलीला तिनें विवाह केला म्हणून कामावरून दूर करण्यास इटालियन पार्लमेंटानें बंदी केली आहे. फक्त अविवाहित स्त्रियांनाच इटालिअन फर्म्स नोकरीवर ठेवतात. नोकरीच्या करारांतील " विवाहानंतर नोकरींतून जावें लागण्याची " शर्त बेकायदा ठरविण्यांत आली आहे. विवाहानंतर एका वर्षाचे आंत नोकरीवरून दूर करण्यांत आलें, तर त्याचें कारण विवाह हें नव्हतें, हें मालकानें सिद्ध केलें पाहिजे.

## पंजाब राज्यांत लोखंडाच्या खनिजाचा साठा

पंजाब राज्याच्या मोहिंदरगढ जिल्ह्यांत लोखंडाच्या खनिजाचे साठे सापडले आहेत. प्राथमिक अहवालाप्रमाणें ह्या भागांत सुमारें ३० लाख टन खनिज आहे. १,००० टन खनिज राष्ट्रीय धातू संशोधन मंडळाकडे तपासणीसाठी पाठविले असता त्यापासून बिडाचें लोखंड तयार करतां येईल असें दिसून आलें. कांग्रा जिल्ह्यांतहि कांहीं ठिकाणीं लोखंडाचा साठा आढळून आला आहे.

## कोळशाऐवजीं तेलाचें इंधन

उत्तर भारतामधून पश्चिमेंतील व दक्षिणेंतील कारखान्यांना कोळशाचें इंधन पुरविण्यांत वारंवार अडचणी उत्पन्न होतात म्हणून भारत सरकारनें ह्या भागांतील कारखान्यांना कोळशाऐवजीं तेलाच्या इंधनाचा वापर करावा अशी सूचना केली होती. याप्रमाणें दक्षिण भारतामधील एका सिमेंटच्या कारखान्यानें औद्योगिक शक्तीसाठी तेल वापरण्यास प्रारंभ केला आहे. त्यामुळें सिमेंटच्या किंमतींत प्रमाणशीर वाढ करण्याची परवानगी मध्यवर्ती सरकारनें सदर कारखान्याला दिली आहे.

दातांच्या स्वच्छतेसाठी
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

### युराग्वेमधील शहरांत महात्मा गांधी पार्क

युराग्वेमधील ला प्लाटा ह्या शहरांत महात्मा गांधींच्या स्मृती-निमित्त 'महात्मा गांधी पार्क' तयार करण्यांत येणार आहे. ह्या स्मारकासाठी शहराच्या नगरपालिकेनें शहराच्या महत्त्वाच्या भागांत जागा देऊ केली आहे. शहरांत १,००० पार्कस असून त्या सर्वांत नवीन होणारे पार्क मोठे होईल. शहरांत प्रवेश करण्यासाठी जो मुख्य रस्ता आहे त्यावरच ह्या उद्यानाची योजना करण्यांत आली आहे. उद्यानाच्या आंखणीविषयीं सूचना करण्यासाठी ला प्लाटाच्या नगरपालिकेनें युराग्वेमधील भारतीय राजनैतिक कचेरीकडून एक अधिकारी मुद्दाम मागवून घेतला होता. भारताचें आध्यात्मिक ऋण फेडण्याच्या बुद्धीनें उद्यानाचा उपक्रम हातीं घेण्यांत आला आहे.

---

### उदयपूर येथील बिडाच्या लोखंडाचा कारखाना

उदयपूर येथें काढण्यांत येत असलेल्या बिडाच्या लोखंडाच्या कारखान्याचें काम जलदीनें पुरें करण्यांत येत आहे. कारखान्याच्या उभारणीसाठी ८ कोटी रुपये भांडवल लागणार असून त्यामधून दरसाल १ लाख टन चांगल्या प्रतीच्या लोखंडाचें उत्पादन होऊं शकेल. मोटारींना व यांत्रिक हत्यारांच्या कारखान्यांना लागणारें लोखंड कारखान्यांत तयार होईल. अशा प्रकारचें लोखंड निर्माण करणारा भारतामधील हा पहिलाच कारखाना आहे. कारखान्यासाठी ४ कोटी रुपयांची यंत्रसामग्री आयात करण्यांत येणार असून ही रक्कम युगोस्लाव्हिआनें दिलेल्या कर्जांतून दिली जाईल.

---

### बांगड्यांच्या धंद्यावर आलेलें संकट

द्रव स्थितीमधील सोनें मिळेनासें झाल्यामुळें उत्तरप्रदेशांतील फेरोझाबाद येथील कांचेच्या बांगड्या तयार करण्याच्या धंद्यावर संकट कोसळलें आहे. बांगड्यांवर सोन्याचें पाणी देण्यासाठी सोन्याच्या द्रव्याची आवश्यकता असते. परंतु तें बाजारांतून बेपत्ता झालें आहे. भारत सरकारनें सुवर्णावरील निर्बंध जाहीर केल्यामुळें ही कठीण परिस्थिति निर्माण झाली आहे. फेरोझाबाद येथें बांगड्या तयार करणारे ८० कारखाने असून त्यावर २०,००० कामगारांचा योगक्षेम अवलंबून आहे. सर्व कारखान्यांत मिळून रोज ३०० औंस सोन्याचा द्राव खपत असे. दरसाल १८ कोटी रुपयांच्या बांगड्या कारखान्यांतून तयार करण्यांत येत असतात. बांगड्यांवर संस्कार करण्यासाठी एखादें नवें रसायन शोधून काढणें अगर कारखान्यांच्या सोन्याच्या द्रावाच्या खपानुसार त्यांना परवाने देणें ह्या दोनच मार्गांनीं धंदा वाचवितां येईल. कांहींच मार्ग न निघाल्यास फेरोझाबादच्या २ लाखांच्या लोकसंख्येवर उपासमारीचा प्रसंग येईल.

---

### रशियाला पादत्राणांची निर्यात

सोव्हिएट रशियांतील लोकांना भारतामधील बूटजोड्या चांगल्या पसंत पडल्या आहेत. त्यामुळें चालू वर्षी रशियानें ५ लाख बूट-जोड्या भारताकडून आयात करण्याचें ठरविलें आहे. त्यांची किंमत सुमारें १·२५ कोटी रुपये होईल. ही निर्यात सरकारी निर्यात कॉर्पोरेशन मार्फत करण्यांत येईल. पूर्व जर्मनीहि भारताकडून बूट घेण्याचा विचारांत आहे.

---


### कागदाचा सहकारी कारखाना

दक्षिण महाराष्ट्रांत सहकारी तत्त्वावर चालविण्यांत येणारा एक कागदाचा कारखाना काढण्याचा विचार शेतकरी सहकारी साखर कारखाना, सांगलीतर्फे करण्यांत येत आहे. या बाबतींत कारखान्याला कोल्हापूर व सातारा जिल्ह्यांतील सहकारी साखर कारखान्यांचें सहकार्य लाभलें आहे. संकल्पित कागदाचा कारखाना वृत्तपत्रांना लागणारा कागद दरसाल ३६,००० टन निर्माण करणारा असेल आणि तो उभारण्यासाठी ७ कोटी रुपये भांडवल लागेल. उसाच्या कारखान्यांतील चिपाडांचा उपयोग करून कागद तयार करण्यांत येणार आहे. सध्यां चिपाडांचा उपयोग जळण म्हणून करण्यांत येतो. कारखान्यासाठी मध्यवर्ती सरकारकडे परवाना मागण्यांत आला आहे.

---

### पोलादाचे छोटे कारखाने

ब्रिटनच्या लोखंड व पोलाद धंद्याचें एक प्रतिनिधिमंडळ भारताच्या दौऱ्यावर आलें होतें. मंडळानें असा सल्ला दिला आहे कीं, भारतांत दरसाल १ लाख टन पोलाद निर्माण करणारे मध्यम आकाराचे कारखाने काढण्यांत यावेत. अशा प्रकारचे कारखाने दक्षिण भारतांत काढणें विशेष सोयीस्कर आहे. कारण दक्षिण भारतामधील कमी प्रतीचा कोळसा वापरून पोलादाचें विकेंद्रित उत्पादन करतां येईल व बंगाल-बिहारमधील चांगल्या प्रतीचा कोळसा दूर अंतरावरून वाहून आणण्याचें कारण पडणार नाहीं. अर्थात् मोठ्या कारखान्यांशीं हे कारखाने स्पर्धा करूं शकणार नाहींत.

Pratibha-62-4

## युराग्वेमधील शहरांत महात्मा गांधी पार्क

युराग्वेमधील ला प्लाटा ह्या शहरांत महात्मा गांधींच्या स्मृतीनिमित्त ' महात्मा गांधी पार्क ' तयार करण्यांत येणार आहे. ह्या स्मारकासाठी शहराच्या नगरपालिकेनें शहराच्या महत्त्वाच्या भागांत जागा देऊ केली आहे. शहरांत १,००० पार्कस असून त्या सर्वांत नवीन होणारे पार्क मोठे होईल. शहरांत प्रवेश करण्यासाठी जो मुख्य रस्ता आहे त्यावरच ह्या उद्यानाची योजना करण्यांत आली आहे. उद्यानाच्या आंखणीविषयीं सूचना करण्यासाठी ला प्लाटाच्या नगरपालिकेनें युराग्वेमधील भारतीय राजनैतिक कचेरीकडून एक अधिकारी मुद्दाम मागवून घेतला होता. भारताचें आध्यात्मिक ऋण फेडण्याच्या बुद्धीनें उद्यानाचा उपक्रम हातीं घेण्यांत आला आहे.

---

## उदयपूर येथील बिडाच्या लोखंडाचा कारखाना

उदयपूर येथें काढण्यांत येत असलेल्या बिडाच्या लोखंडाच्या कारखान्याचें काम जलदीनें पुरें करण्यांत येत आहे. कारखान्याच्या उभारणीसाठी ८ कोटी रुपये भांडवल लागणार असून त्यामधून दरसाल १ लाख टन चांगल्या प्रतीच्या लोखंडाचें उत्पादन होऊं शकेल. मोटारींना व यांत्रिक हत्यारांच्या कारखान्यांना लागणारें लोखंड कारखान्यांत तयार होईल. अशा प्रकारचें लोखंड निर्माण करणारा भारतामधील हा पहिलाच कारखाना आहे. कारखान्यासाठी ४ कोटी रुपयांची यंत्रसामग्री आयात करण्यांत येणार असून ही रक्कम युगोस्लाव्हिआनें दिलेल्या कर्जातून दिली जाईल.

---

## बांगड्यांच्या धंद्यावर आलेलें संकट

द्रव स्थितीमधील सोनें मिळेनासें झाल्यामुळें उत्तरप्रदेशांतील फेरोझाबाद येथील कांचेच्या बांगड्या तयार करण्याच्या धंद्यावर संकट कोसळलें आहे. बांगड्यांवर सोन्याचें पाणी देण्यासाठी सोन्याच्या द्रव्याची आवश्यकता असते. परंतु तें बाजारांतून बेपत्ता झालें आहे. भारत सरकारनें सुवर्णावरील निर्बंध जाहीर केल्यामुळें ही कठीण परिस्थिति निर्माण झाली आहे. फेरोझाबाद येथें बांगड्या तयार करणारे ८० कारखाने असून त्यावर २०,००० कामगारांचा योगक्षेम अवलंबून आहे. सर्व कारखान्यांत मिळून रोज ३०० औंस सोन्याचा द्राव खपत असे. दरसाल १८ कोटी रुपयांच्या बांगड्या कारखान्यांतून तयार करण्यांत येत असतात. बांगड्यांवर संस्कार करण्यासाठी एखादें नवें रसायन शोधून काढणें अगर कारखान्यांच्या सोन्याच्या द्रावाच्या खपानुसार त्यांना परवाने देणें ह्या दोनच मार्गांनीं धंदा वाचवितां येईल. कांहींच मार्ग न निघाल्यास फेरोझाबादच्या २ लाखांच्या लोकसंख्येवर उपासमारीचा प्रसंग येईल.

---

## रशियाला पादत्राणांची निर्यात

सोव्हिएट रशियांतील लोकांना भारतामधील बूटजोड्या चांगल्या पसंत पडल्या आहेत. त्यामुळें चालू वर्षी रशियानें ५ लाख बूट-जोड्या भारताकडून आयात करण्याचें ठरविलें आहे. त्यांची किंमत सुमारें १·२५ कोटी रुपये होईल. ही निर्यात सरकारी निर्यात कॉर्पोरेशन मार्फत करण्यांत येईल. पूर्व जर्मनीहि भारताकडून बूट घेण्याचा विचारांत आहे.

---


## कागदाचा सहकारी कारखाना

दक्षिण महाराष्ट्रांत सहकारी तत्त्वावर चालविण्यांत येणारा एक कागदाचा कारखाना काढण्याचा विचार शेतकरी सहकारी साखर कारखाना, सांगलीतर्फे करण्यांत येत आहे. या बाबतींत कारखान्याला कोल्हापूर व सातारा जिल्ह्यांतील सहकारी साखर कारखान्यांचें सहकार्य लाभलें आहे. संकल्पित कागदाचा कारखाना वृत्तपत्रांना लागणारा कागद दरसाल ३६,००० टन निर्माण करणारा असेल आणि तो उभारण्यासाठी ७ कोटी रुपये भांडवल लागेल. उसाच्या कारखान्यांतील चिपाडांचा उपयोग करून कागद तयार करण्यांत येणार आहे. सध्यां चिपाडांचा उपयोग जळण म्हणून करण्यांत येतो. कारखान्यासाठी मध्यवर्ती सरकारकडे परवाना मागण्यांत आला आहे.

---

## पोलादाचे छोटे कारखाने

ब्रिटनच्या लोखंड व पोलाद धंद्याचें एक प्रतिनिधिमंडळ भारताच्या दौऱ्यावर आलें होतें. मंडळानें असा सल्ला दिला आहे कीं, भारतांत दरसाल १ लाख टन पोलाद निर्माण करणारे मध्यम आकाराचे कारखाने काढण्यांत यावेत. अशा प्रकारचे कारखाने दक्षिण भारतांत काढणें विशेष सोयीस्कर आहे. कारण दक्षिण भारतामधील कमी प्रतीचा कोळसा वापरून पोलादाचें विकेंद्रित उत्पादन करतां येईल व बंगाल-बिहारमधील चांगल्या प्रतीचा कोळसा दूर अंतरावरून वाहून आणण्याचें कारण पडणार नाहीं. अर्थात् मोठ्या कारखान्यांशीं हे कारखाने स्पर्धा करूं शकणार नाहींत.

Pratibha-62-4

## उद्योगधंद्यांना लागणाऱ्या कोळशाचा प्रश्न

भारतामधील उद्योगधंद्यांना लागणाऱ्या औद्योगिक शक्तीचा पुरवठा करण्यांत दगडी कोळशाला महत्त्वाचें स्थान आहे. कोळशाचें उत्पादन अगर त्याची वाहतूक ह्याच्यांत कांहीं खंड पडल्यास उद्योगधंद्यांवर त्याचा तावडतोब परिणाम होतो. कारखान्यांना करण्यांत येणाऱ्या कोळशाच्या पुरवठ्याचा अभ्यास करण्यासाठीं आणि त्यासंबंधीं शिफारशी करण्यासाठीं जागतिक बँकेचें एक प्रतिनिधिमंडळ लवकरच भारतांत येणार आहे. प्रतिनिधिमंडळातर्फे करण्यांत येणाऱ्या सूचनांचा देशाच्या अर्थव्यवस्थेवर दूरगामी परिणाम होण्याचा संभव आहे. कोळशाच्या पुरवठ्याचा प्रश्न हा बराच गुंतागुंतीचा आहे आणि त्याचा अभ्यास करण्यासाठीं मंडळाला बरीच श्रमांति करावी लागणार आहे. त्यामुळें मंडळाचा अहवाल पुरा होऊन हातीं पडण्यास एक वर्षाची अवधी लागेल असा अंदाज आहे. म्हणून मंडळ एक हंगामी अहवाल तयार करणार असून कोळशाच्या खपाच्या दृष्टीनें महत्त्वाच्या असलेल्या म्हणजे बंगाल व बिहार राज्यांत त्याच्या कार्यक्षम वाहतुकीची व्यवस्था कशी करावी ह्यासंबंधीं मार्गदर्शन करणार आहे. मंडळानें हा हंगामी अहवाल चार ते पांच महिन्यांत सादर करावयाचा आहे. तथापि कोळशाच्या वाहतुकीची व्यवस्था कायमची कार्यक्षम करण्याच्या दृष्टीनें मंडळातर्फे सादर करण्यांत येणारा अखेरचा अहवालच महत्त्वाचा ठरणार आहे. वस्तुस्थितीची बरोबर कल्पना यावी म्हणून भारताची नियोजन-समिति मंडळाशीं सहकार्य करणार आहे. कोळशाऐवजीं पेट्रोलचा उपयोग औद्योगिक शक्तीसाठीं करतां येईल कीं नाहीं, ह्याचाहि विचार मंडळ करणार आहे.

---

## हातमागाच्या कापडाच्या निर्यातीसंबंधीं अहवाल

भारताच्या स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशनच्या सांगण्याप्रमाणें हातमाग निर्यात संघटनेचे जनरल मॅनेजर श्री. विनायकम् गेल्या वर्षी अमेरिकेचा दौरा करून आले. भारतामधील हातमागावर तयार होणाऱ्या विविध प्रकारच्या कापडाला अमेरिकेच्या बाजारपेठेंत कितपत वाव आहे ह्याची पाहणी करून त्यांनीं आपला अहवाल भारत सरकारला सादर केला आहे. त्यांनीं आपल्या अहवालांत असें सुचविलें आहे कीं लंडन, न्यूयॉर्क, लॉस एंजलिस, इत्यादी मोठ्या शहरांतून अनेक प्रकारच्या हातमागाच्या कापडाची साठवण करणारीं केंद्रें स्थापन करण्यांत यावींत. अशीं केंद्रें स्थापन करण्यांत आलीं तर परदेशी ग्राहकांच्या मागणीप्रमाणें माल पुरविणें सोपें जाईल. भारतामधील हातमागाचा व्यवसाय हा ग्रामोद्योगाच्या स्वरूपाचा असून ग्रामीण भागांत विखुरलेला आहे. त्यामुळें परदेशी ग्राहकांच्या गरजा हातमागवाल्यांना कळवून त्यांच्याकडून पुरेसें उत्पादन करून घेण्यासाठीं १० ते १२ आठवडे लागतात. शिवाय तयार मालाची खपाच्या केंद्राच्या ठिकाणीं वाहतूक करण्यास ५ ते ६ आठवडे लागतात. परदेशी गिऱ्हाईक इतका काल थांबण्यास अर्थातच तयार नसतें. तेव्हां त्यांच्या आवडीनिवडीची दखल घेऊन मागणी असलेल्या हातमागाच्या कापडाची साठवण करणारीं केंद्रें स्थापन करणें एवढा एकच उपाय उरतो. ग्राहकांची आवडनिवड ही एकाच प्रकारची राहण्याची शक्यता अर्थातच कमी असते. म्हणून केंद्रामार्फत आवडीनिवडींतील फरकांची नोंद करण्यांत यावी आणि त्याप्रमाणें हातमागावरील कापडाच्या उत्पादनांत वेळोवेळीं बदल करण्यांत यावेत, अशी सूचना आहे.

---

## ६० कोटी लोकांसाठीं अन्नाची व्यवस्था

संयुक्त राष्ट्र संघटनेनें १९६० सालीं "भुकेपासून मुक्तता" ह्या नांवाखालीं जगांतील लोकसंख्या व अन्नाचा तुटवडा ह्यासंबंधीं प्रचार–मोहीम चालविली होती. त्या वेळीं करण्यांत आलेल्या हिशोबाचा आधार घेऊन संघटनेच्या आंकडेविभागाचे प्रमुख डॉ. पी. व्ही. सुखात्मे ह्यांनीं लंडन येथील रॉयल स्टॅटिस्टिकल सोसायटीला १९६१ सालीं एक अहवाल सादर केला होता. ह्या अहवालांतील माहिती संयुक्त राष्ट्र संघटनेनें एका पुस्तिकेंत प्रसिद्ध केली आहे. पुस्तिकेंत तांत्रिक परिभाषा वापरण्यांत आलेली नाहीं. २० व्या शतकांतील लोकसंख्येची वाढ हा किती स्फोटक प्रश्न झालेला आहे त्याची थोडीबहुत कल्पना पुस्तिकेंतील माहितीवरून येऊ शकेल. जगांतील लोकांच्या आहाराच्या दर्जांत थोडी सुधारणा करावयाची झाल्यास १९८० पर्यंत अन्नपदार्थांचें उत्पादन सध्यांच्या दुपटीनें आणि २० व्या शतकाच्या अखेरीपर्यंत तिपटीनें वाढलें पाहिजे. सध्यां अशी परिस्थिति आहे कीं जगाच्या ३०० कोटी लोकांपैकीं ३० ते ५० कोटी लोकांना पोटभर खावयास मिळत नाहीं आणि निम्म्या अगर एकतृतीआंश लोकांना कनिष्ठ प्रतीचें अन्न मिळतें अगर मुळींच मिळत नाहीं. २० व्या शतकाच्या अखेरीपर्यंत जगाची लोकसंख्या ६०० कोटींच्या घरांत जाईल असा अंदाज संघटनेच्या तज्ज्ञांनीं केलेला आहे. आहारविषयक गरजा सध्यां ज्या प्रमाणांत भागविल्या जात आहेत तेंच प्रमाण कायम ठेवावयाचें म्हटलें तरी आफ्रिकेंतील लोकांसाठीं अन्नपदार्थांचें उत्पादन दुपटीपेक्षा अधिक वाढवावें लागेल. दक्षिण अमेरिकेंतील लोकांसाठीं तिपटीनें वाढवावें लागेल. ह्या हिशोबांत अर्जेंटायना, युरागे व पॅरागे ह्यांचा समावेश नाहीं. अतिपूर्वेकडील व नजीकच्या पूर्वेकडील देशांच्या दृष्टीनें चालू शतकाअखेर अन्नपदार्थांचें उत्पादन १५० टक्क्यांनीं वाढण्यास पाहिजे आहे.

---

## परदेशीय भांडवलाच्या गुंतवणुकींत वाढ

भारताच्या औद्योगीकरणासाठीं परदेशीय भांडवलाची व तंत्रज्ञांची गरज अजून बरींच वर्षे लागणार आहे. परदेशीय भांडवलाच्या भारतामधील गुंतवणुकीची अधिकृत पाहणी नुकतीच करण्यांत आली आहे. तीवरून असें दिसतें कीं खाजगी मालकीच्या विभागांत परदेशीय भांडवलाची गुंतवणूक स्वातंत्र्यप्राप्तीनंतर जवळजवळ तिपटीनें वाढली आहे. १९४८ सालीं भारतांत सुमारें २ अब्ज, ५६ कोटी रुपयांचें परदेशीय भांडवल गुंतलेलें होतें. १९६१ साल अखेर परदेशी भांडवलाची रक्कम ७ अब्ज, ६० कोटी रुपयांपर्यंत वाढलेली दिसते. ह्यावरून परदेशी भांडवलाला भारताचें आकर्षण अजूनहि वाटत आहे असें दिसतें. परदेशांकडून मिळालेलीं कर्जें आणि परदेशी कंपन्यांच्या भांडवलाच्या सहकार्यानें काढण्यांत आलेले उद्योगधंदे ह्यांच्यांतहि वाढ झालेली आहे. दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या कालांत अशा रीतीनें दोन अब्ज रुपये गुंतलेले होते. आतां ही रक्कम तीन अब्जांपर्यंत वाढलेली आहे. खाजगी मालकीच्या विभागांत ब्रिटनकडून सर्वांत अधिक भांडवल पुरविण्यांत आलेलें आहे. ब्रिटननें ४ अब्ज, ४६ कोटी, ४० लाख रुपयांचें भांडवल भारतांत गुंतविलेलें आहे. एकूण परदेशीय भांडवलाशीं ब्रिटननें पुरविलेल्या भांडवलाची टक्केवारी ६५ पडते. ब्रिटनच्या खालोखाल भारताला अमेरिकेकडून भांडवल मिळालेलें आहे. अमेरिकेच्या भांडवलाचा आकडा १ अब्ज, १२ कोटी रुपये इतका आहे आणि एकूण परदेशी भांडवलाशीं अमेरिकन भांडवलाची टक्केवारी १६ आहे.

### झोप आणणारें जपानी यंत्र

जपानमधील एका यांत्रिकानें झोप आणणारें एक यंत्र तयार केलें आहे. हें यंत्र बिछान्यानजीक ठेवलें कीं पावसाचे थेंब ठिबकत असल्यासारखा आवाज त्यामधून बाहेर पडतो. त्या आवाजामुळें ऐकणाऱ्याला १० मिनिटांतच चांगली झोप लागते. तें विजेवर चालणारें असून ६० मिनिटांनंतर आपोआप बंद होतें. त्यामुळें झोपलेल्या माणसाचा निद्राभंग होण्याची भीति राहात नाहीं. यंत्रयुगाच्या धावपळींत सुखानें शांत झोपण्याचें भाग्य दुर्मिळ होत चाललें आहे. त्यामुळें मग झोपेच्या गोळ्या घ्याव्या लागतात. निद्रेची आराधना करतांना कांहीं वेळां प्रमाणाबाहेर गोळ्या घेतल्या जाऊन त्या घेणारा चिरनिद्रेच्या कुशींतहि जातो. जपानी यंत्रज्ञाच्या झोपेच्या यंत्राला 'अंगाई' यंत्र म्हणण्यास हरकत नाहीं.

### बँक ऑफ इंडिया लि.

ह्या बँकेला १९६२ मध्यें १·१० कोटि रु. नफा झाला. १२% डिव्हिडंड दिले जाईल.

### बँक ऑफ बरोडा लि.

ह्या बँकेला १९६२ मध्यें ६३·१९ लक्ष रु. नफा झाला. १६% डिव्हिडंड दिले जाईल.

### ३८ लाखांच्या अबकारी करासंबंधीं वाद

सौराष्ट्रामधील ८०० तेलाच्या गिरण्यांनीं आपली एक संघटना स्थापन केलेली आहे. ह्या संघटनेचें सरकारच्या अबकारी खात्यानें आकारलेल्या कराविषयीं खात्याशीं भांडण चालू आहे. अबकारी खात्यानें संघटनेकडे ३८ लाख रुपयांच्या कराची मागणी केलेली आहे. परंतु संघटनेच्या मतानें अबकारी खात्याच्या चुकीमुळें तेल गिरण्यांना हा भूर्दंड सोसावा लागत आहे. वाद तडजोडीनें सोडविण्याविषयीं संघटनेचे प्रतिनिधी व अबकारी खातें ह्यांच्या बैठकी झाल्या. परंतु तडजोड न निघाल्यानें संघटना आतां कोर्ट-दरबार करणार आहे. सरकारकडून खात्याला आलेल्या परिपत्रकाचा अर्थखातें एकदा एका तऱ्हेनें लावते व दुसऱ्या वेळीं वेगळ्याच तऱ्हेनें लावते, असें संघटनेचे म्हणणें आहे. संघटनेच्या मतानें ही वागणूक दुटप्पीपणाची आहे.

### हिंदी बँकिंगची प्रगति

| | १९५१ | १९६१ | वाढ% |
|---|---|---|---|
| कचेऱ्यांची संख्या | २,७५७ | ४.४९० | + ६३ |
| ठेवींचीं खातीं (हजार) | ३,२९४ | ६,५२४ | +१०२ |
| ठेवी ( कोटी रु. ) | ९१८ | २,०४९ | +१२३ |
| कर्जाचीं खातीं (हजार) | ३८३ | १,२२७ | +२२० |
| कर्जे ( कोटी रु. ) | ६१९ | १,३२१ | +११३ |




### हिंद फिनॅन्स, इंडस्ट्रीज अँड इन्व्हेस्टमेंट लि.

५ एप्रिल, १९५१ रोजीं ही कंपनी नागपूर येथें नोंदण्यांत आली. कंपनीनें पहिल्या वर्षापासून सतत डिव्हिडंड दिले आहे. ३० जून, १९६२ अखेर संपलेल्या वर्षी कंपनीला १७,४४७ रु. निव्वळ नफा होऊन ७½% डिव्हिडंड देण्यांत आलें. कंपनीच्या फक्त शेअरहोल्डरांनाच कंपनींत ठेव ठेवतां येते; त्यामुळें ठेवीदारांना कंपनीच्या कारभाराची माहिती होत राहाते, एवढेंच नव्हें तर तेच तिचे मालक असतात; त्यांनींच निवडलेलें संचालक कंपनीचें मार्गदर्शन करतात. कंपनी आपल्याकडील ठेवींपैकीं बरीच मोठी रक्कम तरती राखते; तरीसुद्धां सुयोग्य गुंतवणुकीमुळें कंपनीला चांगला नफा उरतो. कंपनीचें वसूल भांडवल आतां १,५२,७०० रु. असून ठेवी १४,४५,३२१ रु. च्या आहेत. गेल्या एका वर्षांत ठेवींची रक्कम २ लक्ष, ७५ हजार रु. नीं वाढली आणि वसूल भांडवलांत ३४ हजारांची वाढ झाली, ह्यावरून कंपनीनें संपादन केलेल्या विश्वासाची कल्पना येईल. भोंसले, श्रौति आणि कं. हे कंपनीचे प्रवर्तक आणि मॅनेजिंग एजंट आहेत.

### युनायटेड कमर्शिअल बँक लि.

ह्या बँकेला १९६२ मध्यें ७३·३३ लक्ष रु. नफा झाला. १२% डिव्हिडंड दिले जाईल.

### विचारलहरींच्या प्रक्षेपणाचा प्रयोग

रशिआंतील शास्त्रज्ञांत अलीकडे अतींद्रिय ज्ञानसाधनाविषयीं औत्सुक्य निर्माण झालें असून ह्यासंबंधीं संशोधन करणारी एक संस्थाहि स्थापन करण्यांत आली आहे. येत्या मार्च महिन्यांत रशिआंतील व ब्रिटनमधील कांहीं शास्त्रज्ञ लेनिनग्रॅडपासून कॅंब्रिजपर्यंत विचारलहरी प्रक्षेपण करण्याचा प्रयोग करणार आहेत. रशिअन शास्त्रज्ञांनीं ह्यासंबंधीं कांहीं प्रयोग केले असून अधिक प्रयोग करण्याइतपत समाधान त्यांना लाभलें आहे. विचारलहरींच्या प्रक्षेपणाला अंतराची अडचण भासत नाहीं, असें म्हणतात. मार्चमध्यें करण्यांत येणाऱ्या प्रयोगांत लेनिनग्रॅडमधील कांहींजण ड्रॉईंग्ज काढतील व कॅंब्रिजमधील कांहींजण हातांत कागद-पेन्सिल घेऊन त्याच आकृतींच्या विचारलहरी प्रक्षेपित झाल्यास त्याप्रमाणें आकृति काढतील. रशिअन शास्त्रज्ञांच्या मतानें विचारलहरींचें प्रक्षेपण ही केवळ भौतिक घटना असूं शकेल.

### बँकर्सचा पोषाक सर्वांत चांगला

सर्व व्यावसायिकांत बँकर्सचा पोषाक सर्वोत्कृष्ट असतो, असें इंग्लंडमधील पाहाणींत आढळून आलें आहे. १९६२ मधील पोषाकाच्या दृष्टीनें अनुक्रम असा आहे:—(१) बँकर्स, (२) नट, (३) राजकीय पुढारी, (४) अकौंटंट्स, (५) वकील, (६) शेतकरी, (७) आर्किटेक्ट्स, (८) पत्रकार, (९) प्रकाशक आणि हॉटेल्स मालक, (१०) सरकारी अधिकारी.




हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनीं छापिलें व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.

### हिंद फिनॅन्स, इंडस्ट्रीज अँड इन्व्हेस्टमेंट लि.

५ एप्रिल, १९५१ रोजीं ही कंपनी नागपूर येथें नोंदण्यांत आली. कंपनीनें पहिल्या वर्षापासून सतत डिव्हिडंड दिले आहे. ३० जून, १९६२ अखेर संपलेल्या वर्षी कंपनीला १७,४४७ रु. निव्वळ नफा होऊन ७½% डिव्हिडंड देण्यांत आलें. कंपनीच्या फक्त शेअरहोल्डरांनाच कंपनींत ठेव ठेवतां येते; त्यामुळें ठेवीदारांना कंपनीच्या कारभाराची माहिती होत राहाते, एवढेंच नव्हे तर तेच तिचे मालक असतात; त्यांनींच निवडलेलें संचालक कंपनीचें मार्गदर्शन करतात. कंपनी आपल्याकडील ठेवींपैकी बरीच मोठी रक्कम तरती राखते; तरीसुद्धां सुयोग्य गुंतवणुकीमुळें कंपनीला चांगला नफा उरतो. कंपनीचें वसूल भांडवल आतां १,५२,७०० रु. असून ठेवी १४,४५,३२१ रु. च्या आहेत. गेल्या एका वर्षांत ठेवींची रक्कम २ लक्ष, ७५ हजार रु. नीं वाढली आणि वसूल भांडवलांत ३४ हजारांची वाढ झाली, ह्यावरून कंपनीनें संपादन केलेल्या विश्वासाची कल्पना येईल. भोंसले, श्रोति आणि कं. हे कंपनीचे प्रवर्तक आणि मॅनेजिंग एजंट आहेत.

### युनायटेड कमर्शिअल बँक लि.

ह्या बँकेला १९६२ मध्यें ७३·३३ लक्ष रु. नफा झाला. १२% डिव्हिडंड दिले जाईल.

### विचारलहरींच्या प्रक्षेपणाचा प्रयोग

रशिआंतील शास्त्रज्ञांत अलीकडे अतींद्रिय ज्ञानसाधनाविषयीं औत्सुक्य निर्माण झालें असून ह्यासंबंधीं संशोधन करणारी एक संस्थाहि स्थापन करण्यांत आली आहे. येत्या मार्च महिन्यांत रशिआंतील व ब्रिटनमधील कांहीं शास्त्रज्ञ लेनिनग्रॅडपासून केंब्रिजपर्यंत विचारलहरी प्रक्षेपण करण्याचा प्रयोग करणार आहेत. रशिअन शास्त्रज्ञांनीं ह्यासंबंधीं कांहीं प्रयोग केले असून अधिक प्रयोग करण्याइतपत समाधान त्यांना लाभलें आहे. विचारलहरींच्या प्रक्षेपणाला अंतराची अडचण भासत नाहीं, असें म्हणतात. मार्चमध्यें करण्यांत येणाऱ्या प्रयोगांत लेनिनग्रॅडमधील कांहींजण ड्रॉईंग्ज काढतील व केंब्रिजमधील कांहींजण हातांत कागद-पेन्सिल घेऊन त्याच आकृतींच्या विचारलहरी प्रक्षेपित झाल्यास त्याप्रमाणें आकृति काढतील. रशिअन शास्त्रज्ञांच्या मतानें विचारलहरींचें प्रक्षेपण ही केवळ भौतिक घटना असूं शकेल.

### बँकर्सचा पोषाक सर्वांत चांगला

सर्व व्यावसायिकांत बँकर्सचा पोषाक सर्वोत्कृष्ट असतो, असें इंग्लंडमधील पाहाणींत आढळून आलें आहे. १९६२ मधील पोषाकाच्या दृष्टीनें अनुक्रम असा आहे:—( १ ) बँकर्स, ( २ ) नट, ( ३ ) राजकीय पुढारी, ( ४ ) अकौंटंट्स, ( ५ ) वकील, ( ६ ) शेतकरी, (७) आर्किटेक्ट्स, (८) पत्रकार, (९) प्रकाशक आणि हॉटेल्स मालक, ( १० ) सरकारी अधिकारी.




हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनीं छापिलें व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.